॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

# जनसंपर्क विभाग

जळगाव दि. ४ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या माध्यमशास्त्र प्रशाळेच्या दोन विद्यार्थ्यांनी मार्च २०२३ मध्ये झालेल्या सेट परीक्षेत यश संपादन केले आहे.

माध्यमशास्त्र प्रशाळेतील विद्यार्थी सूर्यकांत देशमुख आणि रोहित देशमुख या दोन विद्यार्थ्यांनी जनसंवाद आणि पत्रकारिता या विषयात सेट परीक्षा उत्तीर्ण केली आहे. आतापर्यंत माध्यमशास्त्र प्रशाळेतील सात विद्यार्थ्यांनी सेट व नेट या परीक्षेत यश संपादन केले आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.व्ही.एल.माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा.एस.टी.इंगळे, कुलसचिव डॉ.विनोद पाटील यांनी कौतुक केले आहे. माध्यमशास्त्र प्रशाळेचे संचालक प्रा.डॉ.सुधीर भटकर, डॉ.गोपी सोरडे, डॉ.सोमनाथ वडनेरे यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले आहे.

## बातमी नं. २

जळगाव दि.४ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्ष आणि गणितशास्त्र प्रशाळाच्या (एम.एस्सी. सांख्यिकी विभाग) वतीने घेण्यात आलेल्या परिसर मुलाखतीमध्ये स्पेक्ट्रम इलेक्ट्रिकल इंडस्ट्रीज लि., जळगाव या कंपनीसाठी सात विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

गणितशास्त्र प्रशाळा (स्टॅटिस्टीक्स विभाग) च्या विद्यार्थ्यांसाठी या परिसर मुलाखती झाल्या. परीसर मुलाखत घेण्यासाठी कंपनीचे कॉस्ट मॅनेजर (व्यवस्थापक) पंकज पाटील, एच.आर. मॅनेजर चेतन चावरीया हे उपस्थित होते. या परीसर मुलाखतीमध्ये ४२ विद्यार्थ्यांची टेस्ट व मुलाखती घेण्यात आल्यात. त्यातून हेमंत पाटील, प्रियंका खैरनार, सामिया पठाण, प्रदिप फुलपगारे, भावेश पाटील, निकीता पाटील, सचिन घागरे या सात विद्यार्थ्यांची निवड झाली. प्लेसमेंट समन्वयक प्रा.रमेश सरदार, उपसमन्वयक डॉ. उज्वल पाटील व प्लेसमेंट ऑफिसर सोनाली दायमा यांनी मुलाखतीचे व्यवस्थापन केले. निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी, प्र-कुलगुरु प्रा. एस. टी. इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, गणित प्रशाळेचे प्लेसमेंट समन्वयक डॉ. हरीभाऊ तिडके, प्रशाळेचे संचालक प्रा.एस.आर. चौधरी, स्टॅटिस्टिक्स विभागाचे प्रमुख प्रा. आर.एल. शिंदे यांनी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

---

जा.क्र.: कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२३ दिनांक: ४ जुलै, २०२३

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी